नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

दिनांक 12/08/2020 (बुधवार)
(दुपार)

## आत्महत्येस प्रवृत्त करणाऱ्या आरोपीविरूद्ध कार्यवाही

पो.स्टे. सावनेर :– अंतर्गत मौजा सावंगी भैय्याजी महाराज सावनेर येथे दिनांक 08/08/2020 चे 19.00 वा. पुर्वीपासुन आरोपी नामे– 1) दिपक मोहन वाडबुधे(नवरा), 2) सौ देवकाबाई मोहन वाडबुधे(सासू) दोन्ही रा. सावंगी भैय्याजी महाराज सावनेर व 3) सौ तेजुबाई सातपुते(ननंद) रा. बेनोडा अमरावती यांनी संगनमत करून फिर्यादीची मोठी बहीण मृतक सौ. दुर्गा दिपक वाडबुधे, वय 25 वर्ष, रा. सावंगी भैय्याजी महाराज सावनेर हिला बाळ होत नसल्याने नेहमी टोमने मारून बोलत होते. तसेच मृतकचा पती दिपक मोहन वाडबुधे हा सुध्दा मृतक हिला याच कारणावरून मारहाण करीत होता. या कारणावरून फिर्यादीची बहीन हिने घटना तारीख वेळी विषारी औषध प्राशन केले. तिची प्रकृत्ती खराब झाल्याने तिला उपचाराकामी मेयो हॉस्पीटल नागपुर येथे नेले असता उपचारा दरम्यान तिचा मृत्यू झाला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– नितेश गजानन घोरसे, वय 24 वर्ष, रा. मेढला नरखेड सावनेर नागपूर यांचे रिपोर्ट वरुन व मर्गच्या तपासात आरोपी कारणीभूत असल्याचे निष्पन्न झाल्यावरून पो.स्टे. सावनेर येथे आरोपी विरुध्द कलम 306, 34 भादंवी. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला असून आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक श्री. सतीश पाटील 8805253982 हे करीत आहे.

## अवैधरीत्या धारदार व घातक शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीला अटक

पो.स्टे.बोरी :– अंतर्गत 02 कि.मी. अंतरावर मौजा प्रभाग क्र. 5 व्हीडीओ चौक येथे दिनांक 11/07/2020 चे 16.00 वा. ते 17.00 वा. दरम्यान आरोपी नामे – आकाश उर्फ टेपरी गोपाल सुरनकर, वय 26 वर्ष, रा. वार्ड क्र. 3, बुटीबोरी हा स्वतः जवळ कोणतातरी दखलपात्र गुन्हा करण्याच्या उद्देशाने विनापरवाना अवैधरीत्या हातात धारदार लोखंडी शस्त्र गावठी कोयता घेवुन गावात दहशत पसरवीत असतांना मिळुन आला आहे.

सदर प्रकरणी सरकार तर्फे नापोशि सत्येन्द्र रंगारी, पोस्टे. बोरी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. बोरी येथे आरोपीविरुध्द कलम 4, 25 भारतीय हत्यार कायदा अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. नमुद आरोपीस अटक करण्यात आली असुन गुन्हयाचा पुढील तपास पोहवा नांदुरकर 9923242589 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर